**<u>ठळक बातम्या</u>**

- दिल्ली स्फोट प्रकरणी तपासयंत्रणांचे देशभरात छापे, मुंब्रा इथून एका संशयिताला अटक

- कालचक्र या जागतिक शांततेसाठी प्रार्थना करण्याच्या बौद्ध उत्सवाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि भूतान नरेशांच्या हस्ते उद्घाटन

- शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हाबाबतच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरु

- बिहार विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यात ६९ टक्क्यापेक्षा जास्त मतदान

**आणि**

- पोर्तुगालचा फूटबॉलपटू क्रिस्तियानो रोनाल्डो २०२६ च्या फिफा स्पर्धेनंतर निवृत्तीच्या तयारीत

**<><><><><>**

दिल्ली स्फोट प्रकरणाचा तपास वेगानं सुरू आहे. राष्ट्रीय तपास संस्था - एनआयए आणि सुरक्षा यंत्रणांनी राष्ट्रीय राजधानी क्षेत्र तसंच जम्मू-काश्मीरमधल्या पुलवामा आणि कुलगामसह अनेक ठिकाणी मोठी कारवाई केली. या छाप्यात मोठ्या प्रमाणात स्फोटकं जप्त करण्यात आली असून, श्रीनगरमधला डॉक्टर तजामुल मलिक याला ताब्यात घेण्यात आलं आहे. कुलगाममध्ये प्रतिबंधित संघटना जमात-ए-इस्लामी या संघटनेच्या ठिकाणांवर छापा टाकण्यात आला. या स्फोटात वापरण्यात आलेली कार गेल्या १० ते १२ दिवसांपासून फरिदाबादच्या अल-फलाह विद्यापीठाच्या पार्किंगमध्ये उभी होती, असं चौकशीदरम्यान समोर आलं आहे. तपास अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली आहे.

दरम्यान, या कार स्फोटाचं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. या स्फोटात वापरण्यात आलेली कार अमित नावाच्या डीलरकडून खरेदी करण्यात आली होती, त्याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.   या प्रकरणातली संशयित डॉ शाहीन शाहीद हिचा भाऊ परवेझ अन्सारी याच्या लखनौमधल्या घरावर उत्तप्रदेश एटीएसने कारवाई केली असून तिथून मोबाईल फोन्स सह इतर यंत्रसामुग्री जप्त केली. महाराष्ट्र एटीएस दहशतवादविरोधी पथकानं मुंब्रा इथून एका संशयिताला अटक केली आहे. त्याच्या घरातून अनेक इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल उपकरणं जप्त करण्यात आली आहेत. जप्त केलेल्या वस्तूंचा तपास केला जात असल्याचं एटीएसनं सांगितलं.

<><><><>

जम्मू काश्मीर मधे सोपोर इथं पोलिसांनी जमात ए इस्लामी या दहशतवादी संघटनेशी संबंधित २५ ठिकाणांवर छापेमारी केली. यात दस्तऐवज, डिजिटल उपकरणं आणि इतर साहित्य जप्त केल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><>

भूतानचा दोन दिवसांचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मायदेशी परतले. प्रधानमंत्र्यांनी आज भूतान नरेश  जिग्मे खेसार नामग्येल वांगचुक यांच्यासह आज थिंपू इथं कालचक्र उत्सवाचं उद्घाटन केलं.  हा जागतिक शांततेसाठी प्रार्थना करण्याचा बौद्ध पारंपरिक उत्सव बौद्ध धर्मगुरु, ‘जे खेनपो’ यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. या दौऱ्यात त्यांनी भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी तसंच  परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा केली. दिल्लीतल्या स्फोटात झालेल्या जीवितहानीबद्दल  राजे वांगचुक यांनी शोकसंवेदना व्यक्त केली. भूतानच्या ऊर्जा प्रकल्पांसाठी सवलतीच्या दराने ४० अब्ज रुपये पतपुरवठा करण्याची घोषणा मोदी यांनी काल केली. नवीकरणीय ऊर्जा, आरोग्य अशा महत्त्वाच्या क्षेत्रात

३ सामंजस्य करारांवर प्रधानमंत्र्यांच्या या दौऱ्यात स्वाक्षऱ्या झाल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज भूतानचे प्रधानमंत्री दाशो त्शेरिंग तोबगे यांच्याशीही चर्चा केली.

<><><><><>

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू बोत्सवानाचे अध्यक्ष ड्यूमा बोको गॅबोरोन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करत आहेत. काल बोत्सवाना इथं २१ तोफांची सलामी देऊन त्यांचं स्वागत करण्यात आलं. व्यापार आणि गुंतवणूक, तंत्रज्ञान, ऊर्जा, कृषी, आरोग्य, औषधनिर्माण, संरक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यासाठी नवीन संधीवर यावेळी चर्चा होत आहे. राष्ट्रपती तिथल्या संसदेला संबोधित करणार आहेत तसंच तिथल्या, भारतीय समुदायाशी संवाद साधणार आहेत. बोत्सवाना मधल्या ऐतिहासिक स्थळांना ही त्या भेट देतील. भारताच्या राष्ट्रपतींची ही पहिलीच बोत्सवाना भेट आहे.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या प्रतिनिधींशी अर्थसंकल्पपूर्व चर्चा केली. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

आज जागतिक न्यूमोनिया दिवस आहे. या निमित्तानं, प्रत्येक बालकाचं न्यूमोनिया पासून रक्षण करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. बालपणातला न्यूमोनिया हा आजार हाताळण्यासाठी केंद्रसरकारनं मजबूत आरोग्य प्रणाली, जनजागृती आणि प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून प्रभावी यंत्रणा उभारल्याचं त्यांनी यात म्हटलं आहे.

<><><><><>

आज सार्वजनिक प्रसारण सेवा दिवस आहे. १९४७ मधे फाळणीनंतर भारतात आलेल्या विस्थापितांना याच दिवशी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी ऑल इंडिया रेडियोवरुन संबोधित केलं होतं. या ऐतिहासिक भाषणाची आठवण म्हणून १२ नोव्हेंबर हा दिवस सार्वजनिक प्रसारण सेवा दिन म्हणून घोषित करण्यात आला.

<><><><>

शिवसेना पक्षाचं नाव आणि अधिकृत निवडणूक चिन्हासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. एकनाथ शिंदे यांच्या गटाला अधिकृत शिवसेना म्हणून मान्यता देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आव्हान दिलं आहे. या संदर्भातली सुनावणी येत्या २ डिसेंबरला होणार होती. मात्र, राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर ही सुनावणी वेळेआधी घ्यावी, अशी विनंती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने केली होती.

त्यामुळे आज न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्यापीठासमोर सुनावणी सुरु आहे.

<><><><>

राज्याच्या कृषी विभागाच्या बोधचिह्न आणि घोषवाक्याचं अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल झालं. 'शाश्वत शेती, समृद्ध शेतकरी' असं घोषवाक्य कृषी विभागाने स्वीकारलं आहे. राज्यभरातून स्पर्धकांनी पाठवलेल्या सतराशे घोषवाक्यांमधून या घोषवाक्याची निवड करण्यात आली आहे. तंत्रज्ञानावर आधारित आधुनिक शेतीसाठी सरकार वचनबद्ध आहे हे या बोधचिह्नामधून दिसून येतं, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. हे बोधचिह्न आणि घोषवाक्य कृषी विभागाच्या सर्व उपक्रमांमधे वापरलं जाईल, असं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं. हे बोधचिह्न भुसावळचे वीरेंद्र पाटील आणि घोषवाक्य परभणीच्या सिद्धी देसाई यांनी तयार केलं आहे.

<><><><><>

बिहार विधानसभेच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी काल मतदान झालं. या टप्प्यात ६९ टक्क्यापेक्षा जास्त मतदान झाल्याचं निवडणूक आयोगानं सांगितलं. पहिल्या टप्प्यात ६५ टक्के मतदान झालं होतं, त्यामुळे दोन्ही टप्पे मिळून बिहार विधानसभा निवडणुकीत एकूण ६६ पूर्णांक ९१ शतांश टक्के इतकं मतदान झालं आहे. बिहारमधे आतापर्यंत झालेल्या सर्व निवडणुकांमधे यंदा सर्वात जास्त मतदान झाल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं. यात पुरुष मतदारांचं प्रमाण ६२ पूर्णांक ८ दशांश टक्के तर महिला मतदारांचं प्रमाण ७१ पूर्णांक ६ दशांश टक्के इतकं नोंदवलं गेलं आहे. निवडणुकीत कोणत्याही प्रकारची हिंसा न होता मतदान शांततेत पार पडल्याचं निवडणूक आयोगानं सांगितलं. १४ नोव्हेंबरला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.

<><><><><>

पोर्तुगालचा सुप्रसिद्ध फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो याने २०२६मध्ये होणाऱ्या फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेनंतर निवृत्त होणार असल्याचं जाहीर केलं आहे. आपली कारकिर्द आता अखेरच्या टप्प्यावर असून वयाची चाळीशी ही निवृत्त होण्याची योग्य वेळ असल्याचं त्याने सौदी अरेबिया इथे एका परिषदेत सांगितलं. येत्या फिफा विश्वचषकाच्या पात्रता फेरीचे सामने सुरू असून उद्या आयर्लंडविरुद्ध पोर्तुगाल हा सामना होणार आहे. हा सामना जिंकल्यास पोर्तुगालचा फिफा स्पर्धेत खेळण्याचा मार्ग मोकळा होईल. जगभरात असंख्य चाहते असलेल्या रोनाल्डो याने आतापर्यंत आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामन्यांमध्ये ९५०पेक्षा जास्त गोल केले आहेत. सध्या तो सौदी अरेबियाच्या अल नस्र या फुटबॉल क्लबसाठी खेळतो.

<><><><><>

सोन्याची तस्करी केल्या प्रकरणी डीआरआय, अर्थात महसूल गुप्तचर संचालनालयानं काल मुंबईत ११ जणांना अटक केली. या कारवाईत ११ किलो

८८ ग्रॅम सोनं आणि ८ किलो ७७ ग्रॅम चांदी जप्त करण्यात आली. तस्करी केलेलं सोनं मुंबईत काळबादेवी आणि माझगाव परिसरात वितळवून स्थानिक बाजारात त्याची विक्री केली जात होती, अशी माहिती गुप्तचर यंत्रणेनं दिली. या प्रकरणी पुढला तपास सुरु असल्याचं डीआरआय च्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><>

प्रसिद्ध अभिनेता आणि माजी खासदार गोविंदा यांना काल रात्री शुद्ध हरपल्यामुळे मुंबईत जुहू इथल्या रुग्णालयात दाखल केलं आहे. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

ज्येष्ठ अभिनेता धर्मेंद्र यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आल्याचं मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयाच्या डॉक्टरांनी आज सांगितलं. धर्मेंद्र यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असून, माध्यमांनी आणि जनतेने अफवांपासून दूर राहावं आणि आपल्या कुटुंबाचा खासगीपणा जपावा, अशी विनंती त्यांच्या कुटुंबीयांनी एका निवेदनाद्वारे केली आहे. सर्वांचं प्रेम आणि शुभेच्छा याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

<><><><><>

मुंबईत पवई इथे सेप्टिक टँकमध्ये गुदमरून एका कामगाराचा मृत्यू झाला असून अन्य एक कामगार अत्यवस्थ आहे. पवई इथल्या सांडपाणी प्रकल्पातल्या सेप्टिक टँकमध्ये हे दोन कामगार सफाईसाठी उतरले होते. मात्र, सेप्टिक टँकमधल्या गॅसमुळे त्यांना त्रास होऊ लागला. त्यामुळे त्यांना ताबडतोब रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यापैकी एका कामगाराचा मृत्यू झाला असून दुसऱ्यावर उपचार सुरू आहेत.

//<><><><><>//